स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधकाचे नाव	:-	लहाने बळीराम शिवाजी
मोबाईल नं.	:-	९४०५०५०१०७
ई-मेल आयडी	:-	lahanebs1981@gmail.com
जात	:-	वंजारी (NT-३)
मार्गदर्शकाचे नाव	:-	डॉ. ए. आर. बादाडे
मोबाईल नं.	:-	९९६०६३२५००
ई-मेल आयडी	:-	abhijeet.badade@gmail.com
विषयाचे नाव	:-	भूगोल
संशोधन विषयाचे शीर्षक	:-	औसा व शिरुर अनंतपाळ तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा तुलनात्मक अभ्यास

औसा व शिरुर अनंतपाळ तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा तुलनात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्या शाखेअंतर्गत भूगोल विषयातील
पीएच.डी पदवी करीता सादर करण्यात
येणाऱ्या प्रबंधाचा सारांश

-:: संशोधक :: -

प्रा. लहाने बळीराम शिवाजी
एम.ए.बी.एड, एम.फिल.

:: मार्गदर्शक ::

प्रा. डॉ. ए . आर. बादाडे
भूगोल विभाग प्रमूख,
कै. व्यंकटराव देशमूख महाविद्यालय, बाभळगाव
ता. जि. लातूर

-:: संधोधन केंद्र ::-

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

ऑगस्ट २०१७

संशोधनाचा विषय :- औसा व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा तुलनात्मक अभ्यास

प्रस्तावना :-

ग्रामीण वसाहतीचा अभ्यास भूगोलाच्या वसाहत भूगोल या शाखेत केला जातो. सांस्कृतिक, आर्थिक , कार्यात्मक आणि भूमी उपयोजनाच्या दृष्टीकोणातून ग्रामीण वसाहती शहरी वसाहतीपासून भित्र असलेल्या दिसून येतात.

वसाहत भूगोलाची ओळख : -

वसाहत भूगोलाच्या माध्यमातून ग्रामीण वसाहतीचा अभ्यास करताना वसाहत म्हणजे काय? या विषयी जाणून घेणे गरजेचे आहे. कारण वसाहत ही वसाहत भूगोलाचा आत्मा आहे. वसाहत भूगोलाच्या ग्रामीण वसाहत भूगोल व नागरी वसाहत भूगोल या दोन ज्ञानशाखांतून अभ्यास केला जातो.

वसाहतीचा अर्थ :

वसाहतीविषयी अनेक भूगोल तज्ञांनी अभ्यास केला असून वसाहत हा शब्द लॅटीन भाषेतील 'Settlement' या शब्दाचे मराठी भाषेत रूपांतर आहे. साधारणत: मानव व पर्यावरण यांच्यातील दृढ संबंधाचे धोतक म्हणजे वसाहत होय.

वसाहत भूगोलाचे महत्व :

वसाहत भूगोलाचे महत्त्व आपणास खालीलप्रमाणे व्यक्त करता येते.

१) पृथ्वीवर वसाहती कुठे ? कशा ? व का? का निर्माण झाल्या या प्रश्नाची उत्तरे वसाहत भूगोलाच्या अभ्यासातून प्राप्त होतात.

२) वसाहतीच्या स्थानावर परिणाम करणारे घटक, वसाहतीचा विकास व वसाहतीची कार्ये याची माहिती वसाहत भूगोलात मिळते.

३) वसाहतीच्या आधुनिकीकरणाची काय आवश्यकता आहे याची माहिती मिळते.

४) वसाहतीच्या नियोजनाचा आराखडा तयार करण्यासाठी याचा उपयोग होतो.

५) प्राचीन काळापासून आजपर्यंत वसाहतीचा विकास व ऱ्हास कशा पध्दतीने झाला आहे. याची माहिती मिळते.

६) ग्रामीण वसाहती आणि नागरी वसाहती यांच्यातील अभिसरण प्रक्रियांचा अभ्यास वसाहत भूगोलात केला जातो.

७) वसाहत भूगोलाच्या अभ्यासामूळे लोकांच्या अर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थितीची माहिती मिळते.

८) वसाहतीमधील बांधकाम व त्यामधील सांस्कृतिक पार्श्वभूमी यांची माहिती प्राप्त होते.

९) नगररचनाकारांना संजोजीत नगराच्या निर्मितीसाठी वसाहत भूगोलाच्या अभ्यासाची गरज आहे.

याप्रकारे आपणास वसाहत भूगोलाच्या अभ्यासाचे महत्व स्पष्ट करता येते.

ग्रामीण वसाहतीचा अर्थ व व्याख्या :

ज्या वसाहतीमध्ये बहूतांशी लोक शेती, लाकूडतोड, खाणकाम व मासेमारी या प्राथमिक स्वरूपाच्या व्यवसायामध्ये गुंतलेले असतात. त्यास 'ग्रामीण वसाहती' असे म्हणतात. कृषीव्यवसाय हा या वसाहतींचा प्रमुख आधार असतो. ग्रामीण वसाहती या कृषि व्यवसायाच्या कार्यशाळाच समजल्या जातात. या वसाहतीमध्ये शेतकरी, शेतमजूर, लोहार, सूतार, व इतर पूरक व्यवसाय करणारे लोक, स्थानिक साधनसामग्रीचा वापर करून बांधलेल्या घरामध्ये राहतात. हे लोक शेतीच्या मशागतीची सर्व कामे सुलभ व्हावीत म्हणून संरक्षण आणि पाणी पूरवठा या दृष्टीने शेताजवळ राहणे पसंद करतात. बहुतांशी वसाहती या ग्रामीण स्वरूपाच्या असून जागतिक लोकसंख्येच्या ६०% पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण वसाहतीमध्ये राहणारी आहे.

"ज्या वसाहतीमध्ये शेतीसारख्या प्राथमिक स्वरूपाच्या व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकांचे प्रमाण जास्त असते त्यांना 'ग्रामीण वसाहती' असे म्हणतात"

"ज्या वसाहतीमध्ये बहुतांशी लोक शेती, लाकुडतोड, ,खाणकाम व मासेमारी या प्राथमिक स्वरूपाच्या व्यवसाययांध्ये गुंतलेले असतात. त्यास 'ग्रामीण वसाहती' असे म्हणतात"

अभ्यास क्षेत्राचे स्थान व विस्तार :

उस्मानाबाद जिल्हायाचे विभागजन करून १६-०८-१९८२ रोजी लातूर या नविन जिल्ह्याची निर्मीती झाली आहे. औरंगाबाद विभागामध्ये असलेला लातूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण पूर्वेस असून अक्षवृत्तीय विस्तार १८° ५' उत्तर ते १८° ७' उत्तर अक्षवृत्त आणि रेखावृत्तीय विस्तार ७३° २५' पुर्व ते १८° ७' पुर्व रेखावृत्त इतका विस्तार आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७१५७ चौ.कि.मी. आहे. या जिल्ह्याची सन २०११ च्या जनगणनेनूसार लोकसंख्या २४५४१९६ इतकी आहे. लातूर जिह्यात लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, रेणापूर, चाकूर, देवणी, जळकोट, शिरूर अनंतपाळ असे एकूण १० तालुके आहेत.

प्रस्तूत संशोधनासाठीचे अभ्यास क्षेत्र लातूर जिल्ह्यातील औसा व शिरूर अनंतपाळ हे दोन तालूके आहेत. औसा तालूका हा पुर्णपणे बालाघाट पठारी भाग असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची ६३४ मी. आहे. या तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८° २' उत्तर अक्षवृत्त ते १८° २२' उत्तर अक्षवृत्ता दरम्यान आहे तर रेखावृत्तीय विस्तार ७६° १६' पुर्व रेखावृत्त ते ७६° ४६' पुर्व रेखावृत्त दरम्यान आहे.

औसा तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १२४८.६१ चौ. कि. मी. असून ग्रामीण वसाहतीचे क्षेत्रफळ १२४३ चौ. कि. मी. आहे. सध्या या तालुक्यात १२६ (२०११) रहिवाशी वसाहती असून एकूण लोकसंख्या २०११ नुसार ३०९५७१ एवढी आहे. या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्या २७३४५३ इतकी आहे. औसा तालुक्यात एकूण २०११ नूसार ०७ मंडळे आहेत. यात भादा, औसा, लामजना, मातोळा, किल्लारी, बेलकुंड व मातोळा या सात मंडळाचा समावेश आहे.

अभ्यास क्षेत्रासाठी निवडलेला दुसरा तालुका शिरुर अनंतपाळ हा बालाघाट पठारी भाग असून समुद्र सपाटीपासून उंची ६३१ मिटर आहे. या तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८° २०' १९" उत्तर तर रेखावृत्तीय विस्तार ७६°५०' २४" पुर्व आहे.

शिरूर अनंतपाळ तालूक्याचे क्षेत्रफळ २०११ च्या जणगणनेनुसार ३३०.०० चौ.किमी. असुन ग्रामीण वसाहतीचे क्षेत्रफळ हेच आहे. सध्या या तालुक्यात ४८ (२०११) रहिवाशी वसाहती असून एकूण लोकसंख्या २०११ नुसार ८३,५१५ एवढी आहे. या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्या ८३,५१५ एवढी आहे. कारण की, पुर्ण तालुका ग्रामीण भाग आहे. शिरुर अनंतपाळ तालुक्यात २०११ नुसार ०३ मंडळे आहेत. यात शिरूर अनंतपाळ,साकोळ,हिसमाबाद (उजेड) या तीन मंडळानुसार अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रस्तूत संशोधनात फक्त ग्रामीण वसाहतीचीच लोकसंख्या व क्षेत्रफळ घेण्यात येणार आहे. औसा शहर याचा विचार करण्यात आलेला नाही.

साहित्याचे पुनरावलोकन :

मानवी संस्कृतीचा मुर्त अविष्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वसाहतीमधील वैविध्यपुर्ण घटक परस्परावलंबी व गतिशील असतात. **कु. एलन सेंपल (१९१२)** या भूगोल विचारवंताच्या व्याख्येप्रमाणे मानव हा गतिशिल घटक आणि वसाहती ही मानवी संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण प्रतिक आहे. प्रथ्वीचे भौगोलिक व्यक्तीमत्वदेखील अस्थिर असल्याने वसाहत देखील स्थल व कालानुरूप बदलत असते. सांस्कृतीक भूदृश्य म्हणून वसाहतीच्या अस्तित्वामूळे संपूर्ण प्रदेशाला प्रवर्तन मिळते. वसाहतीच्या विकास प्रक्रियेनंतर प्रदेशाचा विकास आधार धेऊ लागतो. **हडसन (१९७६)** या विचारवंताने वसाहतींचा संशोधनात्मक अभ्यास अनेक वर्षापासून जागतिक, देश, राज्य, आणि स्थानिक पातळीवर करण्यात येत आहे याचा आढावा खालील प्रमाणे घेता येईल.

१. एस.सी. सिंग आणि एस.बी. सिंग (१९८८)

"Settlement distribution and their correlation with morphometric attributes in simla hills."

या संशोधनात्मक प्रबंधामध्ये तिव्र उतार आणि उंच भूपृष्ठ रचना असणाऱ्या प्रदेशामध्ये कोणत्याही सपाट प्रदेशात योग्य प्रमाणात विकसीत होणाऱ्या वसाहतीसारखा विस्तार अखंडपणे होत नाही. असे त्यांच्या संशोधनाचे प्रकटीकरण आहे. या संशोधनात्मक अभ्यासाच्या विश्लेषनाचा मुलभूत पाया हा वसाहतीची प्रक्रिया आणि अभिक्षेत्रीय प्रक्रिया या प्रदेशाच्या भूरूपिकी गुणाशी संबंधीत आहेत. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे कोणत्याही घटकापेक्षा प्राकृतिक पर्यावरण आणि त्यांचा प्रभाव वसाहतीच्या वतिरणावर हो असतो.

२. एस. बी. सावंत :

" Development and change A Study of village khadaki pune district."

संशोधनाने मागील ४० वर्षाच्या कालावधीतील खडकी गावच्या भौगोलिक परिस्थितीचे पुनरावलोकन करून या गावातील सामाजिक, अर्थिक परिवर्तनाची मिमांसा केली आहे.

३. ए. आर. कुंभार (१९९७)

"Rural Habitat as regional study of rural settlement in Nira valley."

या संशोधनात्मक प्रबंधात निरनिराळ्या ग्रामीण वसाहतीच्या सदृश्य प्रदेशाचा अभ्यास करण्यात आला आहे. निरा नदीच्या खोऱ्यातील ग्रामीणवसाहतीवर भौगोलिक घटकांचा झालेल्या परीणामांचा अभ्यास करण्यात आला आहे.

४. गौतमक भट्टाचार्य (१९९५)

"Development problem or rural settlement in the costal area or the Bhai region of Gujrat."

या संशोधन लेखाचा प्रमुख उद्देश -

१) ग्रामीण विकासासाठी पर्यावरणीय समस्या समजून घेणे.

२) गूजराज राज्यातील भाल प्रदेशाच्या किनारी भागाचे सूक्ष्म पातळीवर नियोजन करण्यासाठी भौगोलिक माहिती उपलब्ध करून देणे हा होता.

५. एन. व्ही. पवार :

"Geographical analysis of Rural settlement in Beed District."

या संशोधनात्मक प्रबंधामध्ये बीड जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीवर भौगोलिक घटकाबरोबर सांस्कृतिक घटकाचा झालेल्या परिणामाचा संशोधनात्मक दृष्टीकोणातून अभ्यास करण्यात आला आहे. आधुनिक काळात ग्रामीण वाहसतीच्या संरचनेवर झालेल्या परिणामांची मिमांसा करण्यात आली आहे.

६. ब्रुहन्स (१९१०) :

यांनी मानवी मूगोलाच्या पूस्तकात प्रथम खंडामध्ये घरांची निर्मीती, ग्रामीण वसाहती आणि नागरी वसाहतीची स्थिती आणि प्रारूप यांचे विश्लेषन केले आहे.

७. डॉ. कनकुरे (१९८६) :

यांनी मराठवाड्यातील ग्रामीण आणि नागरीवसाहतीचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे. या संशोधन अभ्यासामध्ये मराठवाड्यातील वसाहतीच्या उत्क्रांतीपासून ते १९८६ पर्यंत वसाहतीमध्ये झ ाालेल्या परिवर्तनाचे विश्लेषण केले आहे.

८. रूडबर्ग (१९५७) :

यांनी ग्रामीण वसाहतीचा संशोधनात्मक अभ्यास करून ग्रामीण वसाहतीचे वितरण फक्त नैसर्गिक घटकावरून निश्चित होत नाही. तर वसाहतीच्या वितरणावर इतर घटकाचा परिणाम होतो असे स्पष्ट केले आहे.

९. बॉयलुंड (१९५६) :

यांनी ग्रामीण वसाहतीचा संशोधनात्मक अभ्यासावरून आणि निरीक्षणावरून चांगील मृदा असलेल्या प्रदेशामध्ये वसाहतीची स्थापना झाली आहे.

१०. अरूसो (१९२०) :

यांनी ग्रामीण लोकसंख्येची व्यवस्था व लघूशोध ग्रामीण वसाहतीच्या विविध प्रकाराचा लोकसंख्येच्या रचनेचा आणि वसाहतीच्या रचनेचा अभ्यास केला आहे.

११. गोपाल कृष्ण आणि चंदना (१९७७) :

यांनी स्वस्त धान्य दुकान, शाळा, पोस्ट कार्यालय, डिस्पेन्सरी आणि पशुवैद्यकिय सेवा यांच्या आधारे ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास केला आहे.

वसाहतीच्या अभ्यासाची विविध तज्ञांनी लिहीलेली संदर्भग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत. यात त्यांनी ग्रामीण वसाहतीच्या विविध स्वरूपाचा आणि जगातील निरनिराळ्या पर्यावरणातील वसाहतीचे विश्लेषन केले आहे. डिकिन्सन (१९४०), नेल्सन (१९५२), सिंग (१९६१), हॅगेट (१९६५), मुखर्जी (१९७०), हडसन (१९७६), सिन्हा (१९७६), सिंग (१९७७), मंडल (१९७९), यादव (१९९७), चौधरी (१९४०), शेख (२००७), मरेवाढ (२००७), शर्मा (१९७२), सिन्हा (१९७६), भोळे (१९८५), यादव (१९९७), कोळपे (२०१२), चिमनगुंडे (२०१३) यांचा समावेश होतो. लातूर व औसा तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा अभ्यास करताना ग्रामीण वसाहतीची मिर्मिती वाढ, विकास व उत्क्रांती यांचा परिसराशी असणारा संबंध त्याचबरोबर जमिनीची उंची, पाणीपुरवठा, जमिनीचे स्वरूप आणि इतिहासकालीन संरक्षण, गरजा या घटकाचा सहसंबध स्पस्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय वसाहतीचे स्थान, वसाहतीचे प्रकार, वसाहतीचे प्रारूप आणि वसाहतीची अंतर्गत रचना यांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. यात त्यांनी विविध प्रदेशातील ग्रामीण वसाहतीवर परीणाम करणारे घटक केंद्रीयता, कार्ये, सेवाक्षेत्र, अंतर यांचा अभ्यास केला आहे. एकुणच ग्रामीण वसाहतीमधील आंतरक्रिया यांचा अभ्यासाचा समावेश होतो.

संशोधनाची उदिष्ट्ये :

सदरील शोधप्रबंधामध्ये खालील उदिष्ट्ये समोर ठेवून औसा व शिरूर अनंतपाळ तालुक्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१. अभ्यास क्षेत्राच्या ग्रामीण वसाहतीच्या वितरणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसातीच्या प्रारूपाच्या आणि प्रकाराचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. अभ्यास क्षेत्रातील घरांचे प्रकार, रचना व बांधकाम साहित्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४. अभ्यास क्षेत्रात प्राकृतिक रचनेला अनूसरून काही ग्रामीण वसाहतीची अंतर्गत रचना अभ्यासणे.

५. अभ्यास क्षेत्राच्या ग्रामीण भागात पूरविल्या जाणाऱ्या सेवा सूविधांचा अभ्यास करणे.

गृहितके :

१. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतीची वाढ नैसर्गिक आणि सांस्कृतिक घटकावर अवलंबून असते. त्यामूळे सर्वत्र सारख्या प्रमाणात वसाहतीची वाढ झालेली नसते.

२. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतीचे प्रकार आणि प्रारूपे सर्वत्र सारखे आढळत नाहीत.

३. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतीतील सेवा केंद्राचे वितरण सर्व वसाहतीत सारखे नसते.

माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती :

प्रस्तूत संशोधन कार्यासाठी मिळालेली माहिती प्राथमिक व दुय्यम स्वरूपातील असून प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी सर्वेक्षण, मूलाखत व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात येणार आहे. ग्रामीण वसाहतीच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास तालुक्यातील मंडळानूसार प्रत्येकी एक गावाचा यादृच्छिक पध्दतीने निवडून सूक्षरित्या करण्यात येईल.

निवडक गावाचे नमूना सर्वेक्षण करून वसाहतीचा अभ्यास केला जाईल. तर व्दितीयक स्वरूपाची माहिती मिळविण्यासाठी लातूर जिल्ह्याचा जनगणणा अहवाल, लातूर जिल्ह्याचे सामाजिक व अर्थिक समालोचन, विविध संशोधन प्रत्रिका, लातूर जिल्हा गॅझेटीयर, विविध संदर्भ ग्रंथ, भारतीय भूस्थलदर्शक नकाशे, गूगल अर्थ वेबसाईट, सॅटेलाईट फोटो इ. आधार घेण्यात येईल. गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण व तालिकाकरण करून माहितीचे सांख्खिकीय पध्दतीने पृथकरण करण्यात येईल.

सदरील संशोधन लेखाच्या विश्लेषनासाठी विविध अभ्यास पध्दतीचा उपयोग करण्यात येईल.

१. ग्रामीण वसाहतीमधील लोकसंख्येची सरासरी काढण्यासाठी पुढील सूत्राचा वापर करण्यात येईल.

सुत्र :- $S = \frac{P}{N}$

खुलासा S = ग्रामीण लोकसंख्येची सरासरी

P = ग्रामीण लोकसंख्या

N = ग्रामीण वसाहतींची संख्या

२. निकट शेजारी विश्लेषन मुल्य काढण्यासाठी **क्लार्क** आणि **इवान्स** यांच्या सांख्यिकीय पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

सुत्र :- $Rn = २\bar{d}\sqrt{\frac{N}{A}}$

खुलासा Rn = निकट शेजारी विश्लेषन

d = अभ्यास क्षेत्रातील निरीक्षण केलेल्या शेजारी बिंदुमधील सरासरी अंतर.

N = वसाहतींची संख्या

A = क्षेत्रफळ (चौ. कि. मी.)

३. अभ्यास क्षेत्रातील वसाहतीच्या प्रकाराचा अभ्यास करण्यासाठी **मंडलाच्या प्रकिर्णन सूची** पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

सुत्र :-

$$\text{Index of Dispersal} = \frac{\text{Average Population size of Settlement (a)}}{\text{Average spacing of settlement (b)}}$$

$$a = \frac{\text{Tatal Rural Settlement}}{\text{No.of .Settlement}} \qquad b = \sqrt{\frac{\text{Tatal Rural Area}}{\text{No.of .Settlement}}}$$

४. ग्रामीण वसाहतीची घनता काढण्यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

सुत्र :-

$$DRS = \frac{\text{Total Number of Inhabited villages}}{\text{Total Rural Area}} \text{ x १००}$$

५. ग्रामीण वसाहतीतील अंतर काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$D = \sqrt{\frac{A}{N}}$$

खुलासा - D = सरासरी अंतर

A = एकूण क्षेत्रफळ

N = वसाहतीची संख्या

६. ग्रामीण वसाहतीमधील सेवा सुविधाची क्षमता काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

सुत्र :-

$$Xie = \frac{Pi}{MP}$$

खुलासा

Xie = सेवा सुविधांची अपेक्षित संख्या

Pi = एकूण ग्रामीण लोकसंख्या

MP = प्रती एक सेवा सुविधावर अवलंबून असलेली लोकसंख्या

$$MP = \frac{P}{FI}$$

खुलासा

P = एकूण लोकसंख्या

Fi = प्रत्येक एक सेवा सुविधांची एकूण संख्या

प्रकरण योजना

प्रकरण पहिले :- संकल्पनात्मक मांडणी

प्रस्तूत प्रकरणामध्ये अभ्यास क्षेत्राची प्रस्तावना, वसाहत भूगोलाची ओळख, वसाहत भूगोलाची व्याप्ती, वसाहत भूगोलाचे महत्व, वसाहत भूगोलाचा इतर शास्त्रीय असलेला संबंध, ग्रामीण वसाहती उत्क्रांती, अभ्यास क्षेत्राची निवड, उद्दिष्टे, गृहितके, माहिती स्त्रोत, व संशोधन पद्धती, नकाशाशास्त्रीय स्त्रोत, साहित्याचे पुनरावलोकन, प्रकरण योजना इत्यांदीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे :- ग्रामीण वसाहतीची उत्क्रांती

प्रस्तूत प्रकरणात ग्रामीण वसाहतीच्या उत्क्रांतीचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये ग्रामीण वसाहतीची उत्क्रांती, पूर्व ऐतिहासिक कालखंडातील वसाहती, आर्यकालिन वसाहती, मुस्लिम आणि ब्रिटीश कालखंडातील वसाहती, वसाहतीच्या नावाचे उपपद, प्राकृतिक घटकाला अनुसरून वसाहतीची नावे, याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :- औसा व शिरुर अनंतपाळ तालुक्यातील भौगोलिक व सांस्कृतिक रचना

प्रकरण तीनमध्ये प्राकृतिक व सांस्कृतिक घटक यात विभाजन करण्यात आले आहे. प्राकृतिक घटकामध्ये अभ्यास क्षेत्राचे स्थान व विस्तार , प्राकृतिक रचना, नदीप्रणाली, हवामान, पर्जन्य, मृदा, भूमी उपयोजन, इत्यादींचा तर सांस्कृतिक घटकामध्ये लोकसंख्या, ग्रामीण वसाहतीची घनता, लिंग गुणोत्तर, साक्षरता प्रमाण, वाहतूक व दळणवळण यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :- औसा व शिरुरुअनतपाळ तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचे वितरण व स्थान

प्रस्तूत प्रस्तुत तालुक्यातील रस्त्यांना अनुसरून ग्रामीण वसाहतीचे वितरण, लोकसंख्येच्या घनतेला अनुसरून ग्रामीण वसाहतीचे वितरण, लोकसंख्येच्या गटाला अनुसरुन ग्रामीण वसाहतीचे वितरण, जलसिंचनाखालील जमीन आणि ग्रामीण वसाहतीचे वितरण, ग्रामीण वसाहतीच्या वितरणाचे अभिक्षेत्रीय प्रारूप, ग्रामीण वसाहतीचे स्थान, ग्रामीण वसाहतीच्या स्थानानुसार वितरण याचा तूलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे :- औसा व शिरुर अनंतपाळ तालुक्यातील ग्रामीण वसाहतीची वाढ, आकार आणि अंतर

प्रस्तूत अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतीच्या संख्येतील वाढ, ग्रामीण वसाहतीमधील लोकसंख्या वाढ, ग्रामीण वसाहतीच्या सरासरी लोकसंख्या आकारातील बदल, ग्रामीण वसाहतीमधील सरासरी अंतर याचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येण्यार आहे.

प्रकरण सहावे :- ग्रामीण वसाहतीचे प्रकार आणि प्रारूपे

प्रकरण सहा मध्ये अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतीचे विविध प्रारूपे यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच ग्रामीण वसाहतीच्या प्रारूपावर झालेला भौगोलिक व सांस्कृतिक घटकांचा परिणाम याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे :- नमुना सर्वेक्षण

अभ्यास क्षेत्रातील मंडळांनुसार ग्रामीण वसाहती निवडून तेथील घरांच्या प्रकारावर परिणाम करणारे घटक, घर बांधणीसाठी वापरले जाणारे साहित्य, ग्रामीण वसाहतीमधील घरांचा आकार, ग्रामीण घरांची आवश्यक लक्षणे, ग्रामीण घरांची घनता, प्रत्यक्ष क्षेत्र अभ्यासावर आधारित करण्यात येणार आहे.

प्रकरण आठवे :- निष्कर्ष व उपाय योजना

या प्रक रणामध्ये औसा व शिरुर अनंतपाळ तालूक्यातील ग्रामीण वसाहतीच्या संशोधनावर अधारित निष्कर्ष स्पष्ट करण्यात येणार असून ग्रामीण वसाहतीच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी काही ठळक उपाययोजना स्पष्ट करण्यात येतील.

अशा प्रकारे संशोधन प्रबंधाचे एकूण नऊ प्रकरणामध्ये विभागणी करून औसा व शिरुर अनंतपाळ तालूक्यातील ग्रामीण वसाहतीचा भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ

१. अहिरराव वा.र. (१९९७) : अधिवास भूविज्ञान, निराली प्रकाशन, पुणे पृ. १-९.

२. घारपुरे वि. त्र्य. (१९९९) : वस्ती भूगोल, पिपळापुरे ॲण्ड कं, पब्लिशर्स पृ. ८-१४.

३. पेंडसे एस. डी. (१९६५) : महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.

४. भागवत अ.वि. (१९८८) : अधिवास भूगोल, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

५. भारतीय भू-स्थलदर्शक नकाशा.

६. भूगोलशास्त्र परिभाषाकोश (२००४) : प्रकाशक, भाषा संचालनायल, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७. मराठवाडा रिजनल प्लॉनिंग : गोखले इन्सिटट्युट ॲण्ड इकॉनॉमिक्स, पुणे.

८. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, लातूर जिल्हा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

९. लातूर जिल्हा गॅझेटिअर (२००८) : महाराष्ट्र शासन, मुंबई.

१०. सामाजिक व अर्थिक समालोचन २०११

११. Ahmad E (1952) : Rural Settlement type in the Uttar Pradesh, Annals A. A. Geography. PP. 223-246

१२. Baden-Dawell B. H. (1920) : The Indian Village Communiti, Landon P. 51

१३. Brunhes J. (1920) : Human Geography, London, P.579

१४. Bede Powell B. H. (1892) : Land System or British India, Vol 1. Laoadon, P. 97

१५. Cencus of India (2001) : District cencus Hand Book Latur, Director or census, Maharashtra, Bombay.

१६. Cencus of India (2011) : District cencus Hand Book Latur, Primary Abstrct.

१७. Cencus of India (1991) : District Cencus Hand Book Latur, Maharashtra, Bombay.

१८. Doclom RE (1940) : The Dostroniton and functions of the smaller Urban settements of East Anilia Geography Vol. XVII. P. 41-45 Ref. Book.

१९. Syman Leslie (1967) : 'Agricaltural Geography' Londan P. 21

संशोधक

श्री. लहाने बळीराम शिवाजी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. ए. आर. बादाडे
भूगोल विभाग प्रमुख
कै. व्यंकटराव महाविद्यालय बाभळगाव,
ता. जि. लातूर.